# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.01.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी 3 हजार युवा नेत्यांशी साधणार संवाद.
- पुणे जिल्ह्यातील रांजणगांव इथं इलेक्ट्रॉनिक क्लस्टरची स्थापना करण्यात येणार .
- महिलांच्या खो-खो विश्वचषकासाठी प्रियंका इंगळे हिची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड .

आणि

- इंग्लंडविरुद्धच्या वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा.

आता सविस्तर बातम्या

**विकसित भारत**

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार आहेत. विकसित भारतासाठी 1 लाख तरुणांना राजकारणात सहभागी करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या संवादाचा उद्देश आहे. यावेळी तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादनं आणि शेती यासारख्या विषयांवर दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकांचं प्रकाशन होणार आहे. या पार्श्वभूमीवर ‘ विकसित भारत युवा नेते संवाद ‘ हा देशाच्या विकासाच्या प्रवासात तरुणांना सहभागी करून घेण्यासाठी एक वेगळा उपक्रम असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

**सीडॅक**

केंद्रिय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पुण्यातील सीडॅक अर्थात प्रगत संगणन विकास केंद्र या संस्थेला भेट दिली आणि महासंगणक तंत्रज्ञान विकसनशीलतेच्या आणि अन्य औद्योगिक कंपन्यांना उपयुक्त इलेक्ट्रानिक उपकरणांच्या उत्पादनासाठी आवश्यक चीप आणि अन्य तांत्रिक उपकरणांच्या विकासाच्या संदर्भात सीडॅकमध्ये सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. सीडॅकनं विकसित केलेल्या तेजा जेएएस 64 या चीपचं आणि नोवा डेव्हलपमेंट बोर्डचं उद्घाटन वैष्णव यांच्या हस्ते झालं. यानंतर बातमीदारांशी बोलताना अश्विनी वैष्णव म्हणाले की, इलेक्ट्रॉनिक कंपन्यांना आवश्यक असलेल्या चीप्स

आणि सेमीकंडक्टर्स विकसित करण्यासाठी महाराष्ट्रातल्या पुणे जिल्ह्यातील रांजणगांव इथं इलेक्ट्रानिक क्लस्टरची स्थापना करण्यात येणार आहे. पुणे नाशिक रेल्वेमार्गावरील नारायणगाव इथली जीएमआरटी या आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळेवर 23 देश अवलंबून असल्यानं कोणत्याही परिस्थितीत ही वेधशाळा अन्य ठिकाणी हलवणार नाही अशी माहितीदेखील वैष्णव यांनी दिली.
तंत्रज्ञान सामान्य लोकांपर्यंत पोहोचवणं हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मुख्य उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने केंद्र सरकारनं पावलं उचलण्यास सुरवात केली आहे. तसंच तंत्रज्ञान विकासाच्या दृष्टीनं देशात पाच प्रयोगशाळाही विकसित करण्यात येणार असून राष्ट्रीय महासंगणकीय मिशनही प्रगती पथावर असल्याची माहिती त्यांनी दिली. या मिशननुसार महासंगणकातील पन्नास टक्क्यांहून अधिक उपकरणं भारतीय बनावटीची आहेत.

**वैष्णव**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण, रेल्वे तसंच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पुण्यातील भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या प्रेक्षागृहाचं उद्घाटन केलं. उद्घाटनानंतर विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधताना एफटीआयआयला जागतिक स्तरावर आणखी पुढे नेण्याचं ध्येय असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.वैष्णव यांनी प्रस्तावित अभिमत विद्यापीठ दर्जाच्या विविध पैलूंबाबत प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांचं निराकरण केलं. वैष्णव यांनी संस्थेच्या विविध सुविधांची पाहणी केली. नव्या प्रेक्षागृहामध्ये सिनेमा प्रोजेक्टर, अत्याधुनिक ध्वनी यंत्रणा आणि 586 आसन क्षमता आहे.

**शहा अंमली पदार्थ**

गेल्या दहा वर्षांत अंमली पदार्थ जप्त करण्यात सात पट वाढ झाल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत अंमली पदार्थ तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावरील प्रादेशिक परिषदेचे अध्यक्षपद भूषवताना बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अंमली पदार्थांच्या विरुद्धच्या लढाईला नवी ताकद मिळाली असल्याचंही शहा यावेळी म्हणाले. गेल्या दहा वर्षांत 56800 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अंमली पदार्थांची विल्हेवाट लावण्यात आली आहे.

**प्रवासी परिषद**

उत्तराखंडच्या डेहराडून इथ आज आंतरराष्ट्रीय उत्तराखंड प्रवासी परिषदेचं आयोजन करण्यात आलं असून मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांच्या हस्ते होणार आहे. जगातल्या 17 देशातील 60 उत्तराखंडचे अनिवासी भारतीय या परिषदेत सहभागी होणार आहेत. उत्तराखंडमधील उद्योगाचा विकास , परकीय गुंतवणूक , पर्यटन विकास , शिक्षण , रोजगार यामध्ये मूळचे उत्तराखंडचे रहिवासी असणाऱ्या परदेशस्थ भारतीयांचा सहभाग वाढावा या हेतूने धामी यांच्या संकल्पनेतून या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे.

**लष्कर दिन**
सत्त्यातराव्या लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात आयोजित दक्षिण विभागाच्या सन्मान सोहोळ्यात लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्या हस्ते विविध पदकं देऊन लष्करी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. तसंच या दिनाच्या संचलनाची रंगीत तालीम काल घेण्यात आली. पंधरा जानेवारीला होणाऱ्या लष्कर दिन सोहोळ्यात नेपाळ लष्कराचा वाद्यवृंद प्रथमच सहभागी होणार आहे. दोन्ही देशातील मैत्रीपूर्ण संबंधांचा भाग म्हणून नेपाळ लष्करी वाद्यवृंद या सोहळ्यात सहभागी होणार आहे.

**स्पेडेक्स**
इस्रोने स्पेडेक्स या मोहिमेअंतर्गत अंतराळात प्रक्षेपित केलेले दोन्ही उपग्रह एकमेकांपासून 15 मीटर अंतरावर दूर असून ते एकमेकांशी जोडण्यात येणार आहेत. लहान अंतराळयान वापरून त्यांना अंतराळात जोडणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. स्पेडेक्सच्या यशस्वी प्रात्यक्षिकामुळे भारतीय अंतरिक्ष स्टेशन आणि चंद्रावर अंतराळवीर उतरवणे यासारख्या भविष्यातील मोहिमांसाठी महत्त्वाच्या असलेल्या जटिल तंत्रज्ञानात प्रभुत्व मिळवणारा भारत चौथा देश बनणार आहे.

**महाकुंभ**
उत्तरप्रदेशातील प्रयागराज तीर्थ इथं उद्यापासून महाकुंभ मेळा सुरू होत असून उद्याच्या पौष पौर्णिमेच्या पुण्यकाळात पहिलं शाही स्नान होणार आहे. यासाठीची सर्व तयारी पूर्ण झाली असून भाविकांना या पर्व काळात शुद्ध हवेचा आणि ऑक्सीजनचा पुरवठा व्हावा यासाठी विशेष जंगल क्षेत्र विकसित करण्यात आली आहेत. गेल्या 2 वर्षात प्रयागराज शहरात 10 ठिकाणी 55 हजार स्क्वेअर मीटरवर 63 प्रकारच्या 1 लाख 20 हजार झाडे लावून हे जंगल विकसित करण्यात आलं आहे.

**यादी**
दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने 29 उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. माजी आमदार कपिल मिश्रा यांना करावल नगरमधून, हरीश खुराणा यांना मोती नगरमधून आणि आम आदमी पक्षातून भाजपमध्ये सामील झालेल्या प्रियंका गौतम यांना कोंडलीमधून उमेदवारी देण्यात आली आहे. यापूर्वी, पक्षाने 29 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती.

**राऊत**
शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूर महानगरपालिकांसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवेल असं खासदार संजय राऊत यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. पक्षाची ताकद जाणून घेण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कोणत्याही युतीशिवाय या निवडणुका लढवण्याचा सल्ला दिला आहे असंही राऊत यांनी म्हटलं आहे.
अमेरिकाआग-पूल-प्रशांत

अमेरिकेत, लॉस एंजेलिसमध्ये सध्या ईटन, हर्स्ट, केनेथ आणि पॅलिसेड्स या ठिकाणी वणवे लागले असून 38276 एकरमध्ये आग पसरली आहे. तर इतर दोन ठिकाणच्या आगी आटोक्यात आल्याचं वृत्त आहे. यामध्ये किमान 11 जणांचा मृत्यू झाला आहे, तर 13 लोक बेपत्ता आहेत. याआगीमुळे 12 हजारांहून अधिक घरे आणि इतर इमारती नष्ट झाल्या आहेत.
पूर्वेकडे सरकत असलेल्या पॅलिसेड्स आगीमुळे आता ब्रेंटवुडच्या परिसरासह इतर क्षेत्रांना धोका निर्माण झाला आहे. जगप्रसिद्ध गेटी सेंटर कला संग्रहालयदेखील रिकामे करण्यात आलं आहे. तर १ लाखांहून अधिक रहिवाशांना स्थलांतरीत होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बुधवारपर्यंत जोरदार वारे वाहण्याची शक्यता असल्याने आग आणखी पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**खोखो**

भारतात होणाऱ्या महिलांच्या खो-खो विश्वचषकासाठी संघाची घोषणा करण्यात आली असून संघाच्या कर्णधारपदी महाराष्ट्रातील बीड जिल्हयाच्या केज तालुक्यातील कळमंबा गावातील प्रियंका इंगळे हिची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे. उद्यापासून 19 जानेवारीपर्यंत दिल्लीमध्ये इंदिरा गांधी स्टेडियमवर या स्पर्धा होणार आहेत. प्रियंका सध्या प्राप्तीकर सहाय्यक म्हणून कार्यरत असून क्रीडा अधिकारी परीक्षेतही ती उत्तीर्ण झाली आहे.

**टेनिस**

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेला आजपासून सुरुवात आहे. या स्पर्धेत भारताचा सुमित नागल मेलबर्नमध्ये पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत चेक प्रजासत्ताकाच्या टॉमस माचॅकशी लढेल. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी 7 वाजून 50 मिनिटांनी सुरू होणार आहे. ऋत्विक चौधरी बोल्लीपल्ली, रोहन बोपण्णा, युकी भांबरी आणि श्रीराम बालाजी हे खेळाडूदेखील भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. 26 जानेवारीपर्यंत या स्पर्धा सुरू राहणार आहेत.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये भारताचा सामना आयर्लंडविरुद्ध आज गुजरातमधील राजकोट इथल्या सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर होणार आहे. तीन एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या मालिकेतील हा दुसरा सामना असून सकाळी 11 वाजता हा सामना सुरू होणार आहे. मालिकेतील पहिला सामना जिंकून भारत 1-0 आघाडीवर आहे.

दरम्यान भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने पुरुष क्रिकेट संघाची इंग्लंडविरुद्धच्या आगामी पाच सामन्यांच्या वीस षटकांच्या मालिकेसाठी 15 सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. 22 जानेवारीपासून कोलकाता इथं या मालिकेला सुरुवात होणार आहे. सूर्यकुमार यादव कडे संघाचे नेतृत्व असेल तर अक्षर पटेलची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. तर मोहम्मद शमीचं पुनरागमन झालं आहे. १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पार्श्वभूमीवर या मालिकेकडे विशेष लक्ष राहणार आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार